	नि.दि.मु.नं. २२४/२०२० **CNR MHSN14001086-2020** सतिश देसाई विरुध्द श्री. राजाराम देसाई वगैरे

नि.क्र. ५२ वरील आदेश

प्रतिवादी नं. ५, ९, ११, १२ व १३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये वादी व प्रतिवादी नं. २ ते ४ यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. **दावा मिळकतीचे वर्णनः–**

जिल्हा सांगली पोट तुकडी शिराळा पैकी मौजे भाटशिरगांव हद्दीतील मिळकतीचे वर्णन–

भूमापन क्र.	क्षेत्र हे.आर	आकार रुपये/पैसे	हिस्सा
४६/२	०१.८९ पो.ख. ००.०२	०१–१२	संपूर्ण

येणेप्रमाणे मिळकत तदंगभूत वस्तूंसह व सर्व हक्कांसह.

३. अर्ज कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत ही सदर दाव्यातील वादी व प्रतिवादी यांची वडिलार्जित मालकी हक्काची आणि कब्जे वहिवाटीची होती व आहे.

४. सदर मिळकतीबाबत व इतर मिळकतीबाबत वादीने सदर मिळकतींच्या वाटपासाठी या प्रतिवादींच्याविरुध्द मे.कोर्टात दावा दाखल केला

आहे. वादी आणि प्रतिवादी नं. २ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून प्रतिवादी नं. ३ ही त्यांची आई व प्रतिवादी नं. ४ ही त्यांची विवाहित बहिण असून ती कायमस्वरुपी तिच्या सासरी राहत असते. प्रतिवादींनी वादीच्या दाव्यास रितसर कैफियत दाखल केली असून त्यामध्ये वादी, प्रतिवादी यांची लागुपुरती वंशावळ दिलेली आहे. तसेच मयत प्रतिवादी नं. १ हे वादींचे वडील असून वादी व प्रतिवादी नं. १ ते ४ यांनी सदरचा दावा एकमेकांशी संगनमत करुन केलेला आहे असे कथन या प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीमध्ये केलेले आहे व वादी व प्रतिवादी नं. १ ते ४ हे एकत्र कुटुंबात रहात होते आणि सध्या वादी व प्रतिवादी नं. २ व ३ हे एकत्र कुटुंबात रहात आहेत व ते एकविचाराने वागत होते व आहेत.

५. वादी व प्रतिवादी नं. २ व ३ हे नेहमी दांडगाव्याने वागत असतात आणि त्यांच्यामध्ये व या प्रतिवादींमध्ये एकमेकांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाचे खटले देखील झाले आहेत. वादीने सदरचा दावा प्रस्तुत दाव्यातील वाद मिळकतींचे वाटपासाठी दाखल केलेला असून वादीनेच दाव्यामध्ये वाद मिळकतींचे अद्याप वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही आणि प्रतिवादीने देखील त्यांच्या कैफियतीमध्ये वादी, प्रतिवादींच्या वडिलार्जित मिळकतींचे सरस–निरस मानाने वाटप झालेले नाही अशा स्वरुपाचे कथन केलेले असून या प्रतिवादींनी देखील वाटपाची मागणी कैफियतीमध्ये केलेली आहे. तसेच एकमेकांच्या सोईने वाद मिळकतीमध्ये वादी, प्रतिवादींच्या असलेल्या वहिवाटींचा तपशील कैफियतीमध्ये दिलेला आहे.

६. वर नमूद केल्याप्रमाणे परिस्थिती असताना दावा मिळकतीपैकी भू.क्र. ४६/२ म्हणजे सदर अर्जात नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी नं. २

हे दांडगाव्याने या प्रतिवादींना न जुमानता नवीन कायमस्वरुपी आर. सी. सी. इमारत बेकायदेशीरपणे बांधण्याच्या प्रयत्नात आहेत. या प्रतिवादींनी वादी आणि प्रतिवादी नं. २ यांना मध्यस्थांमार्फत सदर मिळकतीमध्ये बांधकाम करु नका असे सांगितले असता वादी आणि प्रतिवादी नं. २ हे ऐकण्यास तयार नाहीत आणि त्यांनी कॉलम उभे करण्यासाठी सदर मिळकतीमध्ये दि. ०८/०६/२०२५ रोजी खड्डे काढण्यास सुरवात केलेली आहे. तसेच आर.सी.सी. बांधकामासाठी लागणाऱ्या काही साहित्याची जुळवाजुळव केलेली आहे. सदर मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप झाल्याशिवाय वादी व प्रतिवादी नं. २ यांना अशा स्वरुपाचे बांधकाम सदर मिळकतीमध्ये कायद्याप्रमाणे करता येणार नाही व तसा त्यांना कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही. अशी परिस्थिती असल्यामुळे सदरचे बांधकाम झाल्यास या प्रतिवादींना सदर मिळकतीचे कायदेशीर मालकीहक्कास कायमचे मुकावे लागणार आहे व तसे झाल्यास या प्रतिवादींचे फार मोठे व पैशाने कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे.

७. सदर प्रतिवादींना सकृत दर्शनी केस आहे. बॅलन्स ऑफ कन्व्हीनियन्स या प्रतिवादींच्या बाजूने आहे. त्यामुळे सदर दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत वादी आणि प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत वर अर्जात वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे नवीन बांधकाम करू नये म्हणून त्यांचेविरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम होणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी नं. ३ ही वयस्कर आहे, तसेच प्रतिवादी नं. ४ ही तिच्या सासरी राहते. प्रत्यक्ष बांधकाम वादी आणि प्रतिवादी नं. २ हे करत आहेत. तथापि सदर मिळकतीबाबत वादी आणि प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे हितसंबंध एकच असल्यामुळे

व त्यांचे एकमेकांचे संगनमत असल्यामुळे वादी आणि प्रतिवादी नं. २ ते ४ या सर्वांच्याविरूध्द तुर्तातुर्त ताकीदीचा हुकूम होणे आवश्यक आहे.

८. यात प्रतिवादी नं. २ ते ४ यांचेतर्फे प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांचे नि. ५२ वे तुर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे नि.क्र. ६३ वर दाखल करुन त्यांनी असे कथन केले की, प्रतिवादी यांचा निशाणी ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज व त्यातील कथने, मजकूर व मागणी खोटी, चूकीची व लबाडीची असून सदर प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. त्यातील कथनांचा व विधानांचा सदर प्रतिवादी हे स्पष्टपणे इन्कार करतात. निशाणी ५२ अर्ज कायद्याने चालणेस पात्र नाही. (Not Maintainable in law).

९. प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी पुढे असे कथन केले की, मौजे भाटशिरगांव, ता. शिराळा, जि. सांगली येथील भूमापन क्र. १/७, ३६/३, ३६/७, ३६/८, ४६/२, ४६/६, ४६/७ पैकी हिस्सा १/३. ४६/८, ५४ पैकी हिस्सा ४ आणे ८ पै., ७०/१, ७०/३, ७३/२ पैकी ४ आणे ८ पै., ७४ पैकी ० हे. ५२.१८ आर.चौ.मी., ७९/३ पैकी १/३, ७९/५, १५२/७, १५२/२२, १५७ पैकी ४२ आर.चौ.मी., २११/१, २१२, या शेतमिळकती त्यामधील समाईक विहिरीच्या व शेतघराच्या हक्कासह व ग्रा.पं. मिळकत नं. १५८, १०८, १०९, २४३ या मिळकती वादी व प्रतिवादी नं. १ ते १५ यांच्या वारस मालकीहक्काच्या व प्रतिवादी नं. १ ते १५ व वादी यांच्या कुटुंबाच्या सोयीनुसार समाईक वहिवाटीच्या मिळकती आहेत. सदर मिळकतीपैकी काही मिळकती या वडीलोपार्जित मिळकतींच्या उत्पन्नातून खरेदी केलेल्या आहेत. वादी, प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार जिवाजी देसाई हे होते. जिवाजी देसाई यांना दादू हा एकमेव मुलगा

वारस होता. सदर दावा मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी नं. १ ते १५ यांची वारसहक्काने समाईकांत सोयीनुसार वहिवाट होती व आहे.

१०. सदर कामातील वादी यांनी दावा मिळकतीमधील त्यांचा हिस्सा सोमवार दि. ११ मे २०२० रोजी वाटून मागितला असता त्यावेळी प्रतिवादी नं. १ यांनी त्यांस नकार दिला. त्यामुळे सदर कामातील वादी यांनी वरील कलम १ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीबाबत प्रस्तुतचा दावा वाटपाकरिता व निरंतर ताकीदीकरिता प्रतिवादी यांचेविरूद्ध दाखल केलेला आहे. सदर दाव्याकामी प्रतिवादी नं. ५, ६, ९,१० ते १३ यांनी वादीच्या दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल केलेले आहे. सदर कैफियतीमध्ये प्रतिवादी नं. ५, ६, ९, १० ते १३ यांनी दावा मिळकतीत वादी, प्रतिवादी यांच्या सोयीप्रमाणे स्वतंत्र वहिवाटी असल्याबाबत कथने करून वादी यांचा दावा नाकारलेला आहे.

११. अशी परिस्थिती असताना प्रतिवादी नं. ५.९,११ते १३ यांनी वादी व प्रतिवादी नं. २ ते ४ यांचेविरूद्ध सी.पी.सी. ऑर्डर ३९ रूल १, २ प्रमाणे दावा मिळकत भूमापन क्र. ४६/२ या मिळकतीतील प्रतिवादी नं. २ यांचे चालू बांधकामाबाबत तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे.

१२. मौजे भाटशिरगांव येथील भूमापन क्र. व उपविभाग ४६/२ ही मिळकत पूर्व–पश्चिम चालीची शेतमिळकत असून त्याचे क्षेत्र १ हे. ८९ आर.चौ.मी., पो.ख. ० हे. ०२ आर.चौ.मी. इतके आहे. सदर मिळकतीच्या पूर्वेस दक्षिण–उत्तर चालीचा रस्ता आहे. सदर दावा मिळकत गट नं. ४६/२ या शेतमिळकतीचा पूर्वेकडील भाग १ हे. ७१ आर.चौ.मी. इतक्या क्षेत्राचा आयाताकृती भाग असून

पश्चिम–दक्षिण कोपऱ्यातील भाग हा ० हे. २० आर.बौ.मी. इतका आहे. सदर मिळकतीमधील १ हे. ७१ आर.चौ.मी. या पूर्व भागाचे पूर्व–पश्चिम चालीचे ३ समान भाग केलेले असून त्याभागातील उत्तर बाजूचा ० हे. ५७ आर.चौ.मी. भाग प्रतिवादी नं. ५ ते ८ यांचे कुटुंबाचे समाईकांत सोयीनुसार वहिवाटीस आहे. त्याला लागून दक्षिणेस म्हणजेच मधील भाग ० हे. ५७ आर.चौ.मी. क्षेत्र प्रतिवादी नं. १ यांच्या कुटुंबाचे सोयीनुसार समाईकांत वहिवाटीस आहे व अगदी दक्षिण बाजूचा ० हे. ५७ आर.चौ.मी. भाग प्रतिवादी क्र. ९ यांचे कुटुंबाचे सोयीनुसार समाईकांत वहिवाटीस आहे. प्रतिवादी क्र. १ यांचे कुटुंबाच्या समाईकांत सोयीनुसार असणाऱ्या मध्य भागामध्ये जुने शेतघर असून सदर घरामध्ये प्रतिवादी क्र. १ हा त्याचे कुटुंबासोबत राहण्यास होता. प्रतिवादी क्र. १ यांनी हयातीत सदर शेतघर मिळकतीचे पश्चिम बाजू लगत एक सोपा स्वखर्चाने बांधलेला होता व आहे. सदर सोप्याच्या बांधकामास प्रतिवादी क्र. ५,९,११ ते १३ यांनी कधीही हरकत अगर तक्रार घेतलेली नव्हती व नाही. प्रतिवादी नं. १ यांच्या हिश्यात असणाऱ्या शेतघराचा ग्रा.प. मिळकत क्र. २४३ असा आहे. प्रतिवादी नं १ यांनी त्या घरामध्ये स्वतःच्या नावे विद्युत पुरवठा घेतलेला आहे. प्रतिवादी नं. १ यांच्या मृत्यूनंतर त्या शेतघरामध्ये प्रतिवादी नं. २, ३ व वादी स्वतंत्र सोयीनुसार राहण्यास आहेत. प्रतिवादी क्र. २ यांनी गट क्र. ४६/२ या मिळकतीतील जुन्या शेत घर मिळकतीचे पूर्व बाजूस जनावरांचा गोठा सन २०१८ साली बांधलेला आहे. त्याचा ग्रा.पं. मिळकत नं. ४२२ हा असून सदर गोठा प्रतिवादी क्र. २ यांचे नावे नोंद आहे. सदर गोठ्याच्या बांधकामास वादी व प्रतिवादी क्र. ५, ९,११ ते १३ यांनी कधीही हरकत अगर तक्रार घेतलेली नव्हती व नाही. सदर शेतधरांचा कर प्रतिवादी क्र.२ व वादी भागवत आहेत. गट नं.४६/२

या मिळकतीमधील पश्चिम–दक्षिण कोपऱ्यातील हे २० आर.चौ. मी. क्षेत्र वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ हे सोयीनुसार समाईकांत वहिवाटत आहेत.

१३. गट नं. ४६/२ या मिळकतीमधील शेतघर हे सुमारे सन १९७५ सालचे असून सदर शेतघर मिळकत जुनी जीर्ण झालेली आहे. सदर शेतघर मिळकतीचे दक्षिण बाजूचे भिंतीमध्ये मोठे हुंबराचे झाड वाढलेले असून सदर झाडांच्या बुद्धांमुळे व मुळयांमुळे सदरची शेतघर मिळकत पडण्याच्या अवस्थेत आलेली आहे. सदर शेतघराचे छप्पर व मातीच्या भिंती जीर्ण झालेल्या असल्यामुळे शेतघर पडण्याच्या अवस्थेत आलेले आहे. सद्या पावसाळा सुरू झालेमुळे सदरचे जुने शेतघर कोणत्याही वेळी पडेल अशी अवस्था सदर शेतघराची झालेली आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. २ यांनी सदर शेतघराच्या उत्तर बाजूस त्यांचे सोयीनुसार वहिवाटीस असणाऱ्या भूमापण क्र. ४६/२ या मिळकतीचे पूर्व भागामधील मध्य भागामध्ये ११३३.६ चौ.फुट इतक्या मापाचे शेतघराचे बांधकाम सव्वा आर.चौ. मी. क्षेत्रामध्ये सुरू केलेले आहे. भूमापन क्र. ४६/२ या मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. २ ते ४ व बादी यांच्या कुटुंबाचा ६३. ६६ आर.चौ.मी. इतका हिस्सा येतो. त्यामधील प्रतिवादी क्र. २ यांना १५.९१ आर.चौ.मी. इतका हिस्सा येतो. त्यामधील केवळ सव्वा आर.चौ.मी. इतक्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी क्र. २ हा बांधकाम करत आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. २ हा त्याला कायदेशीर येणाऱ्या हिश्यापेक्षा जास्त क्षेत्रामध्ये बांधकाम करत नसून सदर प्रतिवादी क्र.५, ९, ११ ते १३ यांचे कायदेशीर येणाऱ्या हिश्येमध्ये कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करून त्यांना आऊस्ट करण्याच्या उद्देशाने बांधकाम करत नाहीत. सदर बांधकामामुळे प्रतिवादी क्र. ५.९. ११ ते १३ यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही अगर सदर प्रतिवादी क्र. २ यांच्या

बांधकामामुळे दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होत नाही.

१४. सदर शेतघर बांधकामासाठी प्रतिवादी क्र. २ यांनी वित्तिय संस्थेचे १,५०,०००/– इतके कर्ज घेतलेले आहे. तसेच नातेवाईक यांचेकडून रक्कम रूपये २,५०,०००/– इतकी रक्कम ऊसनवार म्हणून घेतलेली आहे. सदर रक्कमेतून बांधकामासाठी प्रतिवादी क्र. २ यांनी बांधकाम साहित्य आणलेले असून आजअखेर रक्कम रूपये ४,००,०००/– इतका बांधकामासाठी खर्च झालेला आहे. प्रतिवादी नं. २ यांचे बांधकाम सद्या कॉलमपर्यंत पूर्ण झालेले आहे. प्रतिवादी क्र. २ हे गट नं. ४६/२ या मिळकतीत सन २०१८ पासून बांधकाम करत आहेत. त्यामुळे निशाणी ५२ च्या अर्जास मुदतीची बाधा येत असून सदरचा अर्ज या घडीला कायद्याने मंजूर करणे योग्य होणार नाही.

१५. गट नं. ४६/२ या मिळकतीमधील जुने शेतघर हे पडण्याच्या अवस्थेत असल्यामुळे ते कोणत्याही क्षणी पडण्याची शक्यता आहे. सदर शेतघरामध्ये वादी, प्रतिवादी नं. २ व ३ हे स्वंतत्र राहत आहेत. प्रतिवादी नं. ३ या वयोवृद्ध आहेत. सदर जुने शेतघर पडलेस प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे जिवितास धोका होणार आहे. प्रतिवादी क्र. २, ३ व वादी यांना सदर शेतघराशिवाय अन्य ठिकाणी कोठेही राहण्याची सोय नाही. प्रस्तुतचा वाटपाचा दावा निकाली होणेस बराच कालावधी जाणार आहे. निशाणी ५२ चा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी नं. २ यांच्या कुटुंबियांची राहण्याची अडचण व गैरसोय होणार आहे. यदाकदाचित वादीचा दावा मंजूर झालेस ताकीद अर्जातील नमूद मिळकतीचे सरस–निरस मानाने वाटप करण्यास प्रतिवादी क्र. २ ते ४ यांची कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असणार नाही.

१६. दावा 'ब' १ ग्रा.पं. १५८ (नवीन नं.१०८) ही घर मिळकत मौजे भाटशिरगांव गावामधील गावठान हद्दीतील वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित वाडा स्वरूपाची घर मिळकत आहे. प्रतिवादी नं. ५ ते ८ यांचे कुटुंबाने सदर घर मिळकतीमधील उत्तरेकडील भाग दांडगाव्याने पाडून त्याठिकाणी त्यांना येणाऱ्या सदर मिळकतीमधील कायदेशीर हिश्येपेक्षा जास्त क्षेत्रामध्ये नवीन आर.सी. सी. घर दांडगाव्याने बांधलेले आहे. सदर आर.सी.सी. घरांमध्ये प्रतिवादी नं. ५ ते ८ यांचे कुटुंब राहण्यास आहे. प्रतिवादी नं. ९ यांनी देखील दावा 'ब' १ या घर मिळकतीमधील त्यांच्या कायदेशीर हिश्येपेक्षा जास्त क्षेत्रात डागडुजी केलेली असून ते त्याचा वापर करत आहेत. प्रतिवादी नं. ५ व ९ व त्यांचे कुटुंबिय वादी, प्रतिवादी नं. २ ते ४ यांना दावा 'ब' १ या मिळकतीमध्ये वहिवाट करण्यास मज्जाव करत आहेत.

१७. सदर दावा 'ब' १ या घर मिळकतीचे वाटपाबाबत प्रतिवादी नं.११ व १३ यांनी दि. २८/०४/२०१९ रोजी प्रतिवादी नं. २ यांच्याबरोबर वाद करून त्यांना मारहाण केलेली होती. त्याबाबत शिराळा पोलीस स्टेशनमध्ये भारतीय दंड संहिता १८६० चे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये एफ.आय.आर. ०१०९/२०१९ प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता. दावा शेत मिळकतीमधील प्रतिवादी नं. २ यांचे समाईक वहिवाटीस प्रतिवादी नं. ५ व त्यांचा मुलगा विश्वजीत यांनी दि. २२/०४/२०२० रोजी हरकत केली. त्यावेळी देखील प्रतिवादी नं. २ यांनी शिराळा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे आय.पी.सी. कलम ५०४,५०६ व ३४ प्रमाणे एन.सी.आर. नं. ०२३०/२०२० हि दि.

२२/०४/२०२० रोजी दाखल झालेली आहे.

१८. भूमापन क्र. ४६/२ या मिळकतीमधील प्रतिवादी नं. २ यांचे समाईक सोयीनुसार असणाऱ्या वहिवाटीस प्रतिवादी नं.५, १२, १३ यांचा मुलगा विश्वजीत यांनी दि. २८/१२/२०२१ रोजी हरकत करून शिवीगाळ व दमदाटी केलेली होती. सदर घटनेचा गुन्हा शिराळा पोलीस स्टेशनमध्ये प्रतिवादी नं. २ यांनी एन.सी.आर.नं. ०७०१/२०२१ ही आय.पी.सी. कलम ५०४,५०६ व ३४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

१९. त्याचप्रमाणे गट नं. ४६/२ या मिळकतीमधील प्रतिवादी नं. २.३ व वादी यांच्या वहिवाटीस असणाऱ्या क्षेत्रामध्ये ते वहिवाट करत असताना व सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. २ हे शेतघराचे दि. २९/१२/२०२१ रोजी बांधकाम करत असताना प्रतिवादी नं. २ यांना व त्यांच्या कुटुंबियांना प्रतिवादी नं. ५, १२, १३ व प्रतिवादी नं. ५ यांचा मुलगा विश्वजीत यांनी मारहाण व शिवीगाळी केलेली होती. तसेच धमकी दिलेली होती. त्याबाबत शिराळा पोलीस स्टेशनला भारतीय दंड संहिता २९४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे एफ.आय.आर. नं. ०४३६/२०२१ दाखल केलेली आहे. प्रतिवादी नं. ५,९,११ ते १३ हे हेतूपूर्वक गट नं.४६/२ या मिळकतीमधील प्रतिवादी नं. २ यांचे सोयीनुसार असणाऱ्या वहिवाटीस हरकत करत आहेत. ही बाब वरील गुन्ह्यावरून शाबित होत आहे. यावरून प्रतिवादी नं. ५,९, १२ ते १३ यांचे वर्तन बेकायदेशीर व दांडगाव्याचे असल्याचे दिसून येते. प्रतिवादी नं. २ ते ४ हे कायदा मानणारे इसम आहेत. त्यांना कोणाचा ही पाठिंबा नाही. म्हणून प्रतिवादी नं. २ यांनी वेळोवेळी पोलीस स्टेशनला प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांचेविरूद्ध तक्रारी दिलेल्या

आहेत.

२०. प्रतिवादी नं. ९ यांनी मौजे भाटशिरगांव येथे गावठाण जवळ शेत मिळकत खरेदी केलेली असून सदर मिळकतीमध्ये आर.सी.सी. घर बांधलेले आहे. त्यामध्ये प्रतिवादी नं. ९ हे कुटुंबियासमवेत राहण्यास आहेत. प्रतिवादी नं. ५ ते ७ व ९ व त्यांचे कुटुंबिय दांडगाव्याने वडीलोपार्जित गावठान घर मिळकतीमध्ये नवीन घरे बांधून राहत आहेत. सदरची बांधकामे त्यांनी दावा घर मिळकतीमधील त्यांचे कायदेशीर हिश्येपेक्षा जास्त हिश्यामध्ये अनाधिकाराने व बेकायदेशीरपणे, दांडगाव्याने केलेली आहेत. परंतु प्रतिवादी नं. ५, ९ व ११ते १३ हे हेतूपूर्वक प्रतिवादी नं. २ यांचे बांधकाम बंद पाडण्याच्या उद्देशाने व प्रतिवादी नं. २ यांचे आर्थिक नुकसान व्हावे या उद्देशाने व ऐन पावसाळ्यात प्रतिवादी नं. २ यांचे राहते जुने शेतघर पडून प्रतिवादी नं. २ यांचे कुटुंबिय बेघर व्हावे व त्यांच्या जीवितास धोका व्हावा या उद्देशाने सदर निशाणी ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिल्याचे स्पष्ट होते.

२१. प्रतिवादी नं. ५, ६, ९ ते १३ यांनी कैफियत देऊन गट नं. ४६/२ मधील वादी, प्रतिवादी नं. २ ते ४ यांची वहिवाटी मान्य व कबूल केलेली आहे. सदर वहिवाटीच्या क्षेत्रामध्ये प्रतिवादी नं. २ हे बांधकाम करत आहेत. त्यामुळे निशाणी ५२ च्या ताकीद अर्जामध्ये मागितलेली मागणी व प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांनी दिलेल्या कैफियतीमधील कथनांचा विचार करता परस्पर विरोधाभास घडवतात. त्यामुळे निशाणी ५२ मधील प्रतिवादी यांच्या कथनास "इस्टोपल बाय कंन्डक्ट" या तत्वाची बाधा येते. त्यामुळे प्रतिवादींचा ताकिद अर्ज खर्चासह नामंजूर होणेस पात्र आहे. प्रतिवादी नं. २ ते ४ व वादी हे दावा गट नं. ४६/२ या

मिळकतीतील सहहिस्सेदार आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. २ ते ४ व वादी यांचेविरूद्ध सदर प्रतिवादी यांना कायद्याने ताकीद मागता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा निशाणी ५२ चा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

२२. प्रतिवादी क्र. २ यांनी गट नं. ४६/२ या मिळकतीमध्ये त्यांचे हिश्यामध्ये सन २०१८ पासून बांधकाम सुरू केलेले आहे. परंतु प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांनी त्याबाबत सदर ताकीद अर्ज दाखल करेपर्यंत कोणतीही तक्रार केलेली नाही. ही बाब प्रथम दर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे निशाणी ५२ वा ताकीद अर्ज हा इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर मंजूर करणे कायद्याने योग्य होणार नाही. त्यामुळे Doctrine of laches or acquiescence या तत्वांचा विचार करता निशाणी ५२ चा ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर होणे आवश्यक आहे.

२३. सदर प्रतिवादी यांचे विरूध्द निशाणी ५२ चा ताकीद अर्जात मागितलेली दाद मुळात बेकायदेशीर आहे. दावा गट नं. ४६/२ मिळकतीमध्ये प्रतिवादी नं. २,३ व वादी यांचा समाईक मालकी हक्क वहिवाटीचा हिस्सा असल्याचे त्यांनी प्रथमदर्शनी मे कोर्टात शाबीत केलेले आहे. निशाणी ५२ च्या ताकीद अर्जाकामी प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांनी मटेरियल फॅक्टस् सप्रेस केलेल्या आहेत. प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ हे मे. कोर्टात स्वच्छ हातांनी आलेले नाहीत. त्यामुळे निशाणी ५२ चा ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा. प्रायमाफेसी केस व बैलेंस ऑफ कन्व्हिनियन्स सदर प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे बाजूने आहेत. त्यामुळे अशा प्रकारचा ताकीद अर्ज प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे विरूध्द कायद्याने चालण्यास पात्र नाही. सदर प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांनी प्रतिवादी नं. २ यांचे बांधकाम बंद पाडण्याच्या कुलुषीत उद्देशाने व प्रतिवादी

नं. २ यांचे अर्थिक नुकसान व्हावे या दृष्ट हेतूने निशाणी ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दाखल केलेला आहे. निशाणी ५२ या तुर्तातुर्त ताकीद अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी नं.२ ते ४ यांना त्यांचे दावा गट ४६/२ या मिळकतीमधील समाईक मालकी हक्काप्रमाणे असणाऱ्या वहिवाटीस मे कोर्टाच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ हे हरकत अडथळा करून प्रतिवादी नं. २ ते ४ यांना सदर ताकीद अर्ज मिळकतीमधून आउस्ट करण्याची शक्यता आहे. तसे झालेतर प्रतिवादी नं. २ ते ४ यांचे कधीही पैशाने न भरून येणारे नुकसान होणार आहे. याउलट निशाणी ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. निशाणी ५२ चा तुर्तातूर्त ताकिद अर्ज देवून त्यामध्ये बेकायदेशिर आदेश मिळवणेच्या प्रयत्नात प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ हे आहेत तसे झाले तर सदर आदेशाचा गैरफायदा घेवून प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ हे प्रतिवादी नं. २ ते ४ यांना दावा गट ४६/२ या मिळकतीमधील समाईक वहिवाटीस हरकत अडथळा करणेची शक्यता आहे. तसे करण्याचा प्रतिवादी नं. ५, ९ व ११ ते १३ यांना कायद्याने हक्क व अधिकार येत नाही.

२४. निशाणी ५२ च्या तुर्तातुर्त ताकीद अर्जास काहीही कारण कधीही घडलेले नव्हते व नाही. निशाणी ५२ च्या अर्जास Mis Joinder of Cause of Action या तत्वांची बाधा येते. परंतु प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांनी या प्रतिवादींना मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देण्याच्या हेतूने प्रस्तुत खोटया स्वरूपाचा तुर्वातुर्त ताकीद अर्ज केलेला असल्यामुळे त्यांचा सदरचा निशाणी ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येवून सदर प्रतिवादी यांना नाहक

खर्चात पाडलेबद्दल कॉम्पेन्सेटरी कॉस्ट म्हणून र.रू. १०,०००/– सदर प्रतिवादी यांना प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांचेकडून वसूल होवून मिळणे न्यायोचित होणार आहे. सबब प्रतिवादी नं. २ ते ४ यांची विनंती की, प्रतिवादी नं. ५,९ व ११ ते १३ यांचा नि. ५२ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

२५. वादी तर्फे प्रतिवादी नं. ५,९,११,१२,१३ यांच्या तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे नि.क्र. ७२ वर देऊन त्यांनी असे कथन केले की, सदर प्रतिवादी नं. ५, ९, ११,१२,१३ यांचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज वादी यांना मान्य नाही व कबुल नाही. भु.क. ४६/२ मधील मध्य भागातील भागात असलेल्या शेतघराच्या दक्षिण भागात वादी हे त्यांच्या कुटुंबासहीत राहत आहेत. सदर शेत घराच्या उत्तर बाजुस प्रतिवादी नं. २ हे नविन बांधकाम करीत आहे. वादी हे सदर ठिकाणी बांधकाम करीत नव्हते व नाहीत. सदर प्रतिवादी नं. २ हे करीत असलेल्या बांधकामाबाबत वादी यांची काहीही हरकत नाही.

२६. सदर प्रतिवादी नं. ५,९,११,१२,१३ हे ताकीद अर्जामध्ये म्हणतात त्याप्रमाणेचे, म्हणतात त्याठिकाणी कोणतेही बांधकाम वादी हे करत नव्हते व नाहीत. अशा परिस्थितीत सदर प्रतिवादी यांनी ताकीद अर्ज या वादी विरुध्द सुध्दा दिलेला असल्याने, प्रतिवादी यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे कोणतेही बांधकाम वादी करीत नसल्याने सदरच्या ताकीद अर्जास मुळीच कारण वादीबाबत घडलेले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचा सदरचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. सबब वादी यांनी प्रतिवादी नं. ५, ९,११,१२,१३ यांचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती आहे.

२७. प्रतिवादी नं. ५, ९,११,१२,१३ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एम.मोहिते, प्रतिवादी नं. २ ते ४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.आर.कदम, वादी तर्फे विधिज्ञ श्री.एस.डी.माने यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचे कथनांनुसार युक्तीवाद केला. वादी व प्रतिवादी यांची परस्पर विरोधी कथने व युक्तीवादावरुन माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

अ.नं.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१.	प्रतिवादी नं. ५, ९,११,१२,१३ यांनी सकृत दर्शनी केस सिध्द केली आहे का ?	होकारार्थी
२.	न्यायाचा तराजू त्यांच्या बाजूने आहे का ?	होकारार्थी
३.	त्यांच्या हक्कात तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल का ?	होकारार्थी
४.	कोणता आदेश ?	अर्ज मंजूर करण्यात येतो.

२८. प्रतिवादी नं. २ ते ४ यांनी अर्जाचे कथनापृष्ट्यर्थ कागदयादी नि.क्र. ६९ सोबत भूमापन क्र. व उपविभाग ४६/२ चा संगणकीय ७/१२ उतारा, मालमत्ता क्र. २४३ चा असेसमेंट उतारा, वीज बिल, कर भरलेली पावती, खाते क्र. ६११ चा खाते उतारा, खाते क्र. ६०९ चा खाते उतारा, मालमत्ता क्र. ४२२ चा असेसमेंट उतारा, मालमत्ता क्र. १०८ चा असेसमेंट उतारा, मालमत्ता क्र.

१०८/अ चा असेसमेंट उतारा, मालमत्ता क्र. १०९ चा असेसमेंट उतारा, मालमत्ता क्र. १०९/अ चा असेसमेंट उतारा, विक्रम राजाराम देसाई यांचे नांवचा कर्ज घेतलला दाखला, शालन राजाराम देसाई यांचे नांवचा कर्ज घेतलेला दाखला, भूमापन क्र. व उपविभाग ४२/२ चा मधील घर मिळकतीचे एकूण ४ फोटो, फोटोची पावती, घर बांधकाम प्लॅन, घर इस्टीमेंट प्रत, एफ.आय.आर. नं. ०१०९/२०१९ ची प्रत, एन.सी.आर.नं. ०२३०/२०२० ची प्रत, एन.सी.आर.नं. ०७०१/२०२० ची प्रत, एफ.आय.आर.नं. ०४३६/२०२१ ची प्रत, नि.क्र. ७७ सोबत प्रतिवादीनं. २ यांचे रेशनकार्डची व्हेरीफाईड प्रत, शिराळा पोलीस स्टेशन गु.र.नं. १४४/२०२५ मधील एफ.आय.आर, शिराळा पोलीस स्टेशन गु.र.नं. ९८/५ मधील एफ.आय.आर. इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत.

२९. प्रतिवादी नं. ५,९,११ ते १३ तर्फे नि.क्र. ५५ सोबत दावा मिळकतीचा फोटो दाखल केला आहे. तसेच नि.क्र. ७५ सोबत संपत गणपती देसाई व समाधान गोपाळ देसाई यांची शपथपत्रे दाखल केली आहेत.

प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ तर्फे खालील न्यायनिवाड्यांवर भिस्त ठेवण्यात आली.

1) Sathyabhama Amma Vs. Vijaya Amma AIR 1995 Kerle 74.

The Hon'ble Kerala High Court held that,

> *"In a situation covered by Clause(a), if the property in dispute is in danger of being wasted etc. by any party to the suit, the Court may by order grant a temporary injunction to restrain such objectionable act. In that situation, either the plaintiff or the defendant is entitled to seek for the relief of temporary injunction."*

2) Shiv Ram Singh Vs. Mangara & ors. AIR 1989 Allahabad 164. *The Hon'ble Allahabad High Court held that,*

"Interim injunction in favour of defendant. Plea that relief on injunction should not be granted since no court fee is paid by defendant. Not maintainable as it militates against principle of avoiding multiplicity of proceedings."

3) Chinnamma & ors. Vs.N. Nagaraj & ors. AIR 1996 Karnataka 11.

"*The Hon'ble Karnataka High Court held that, "Temporary injunction- Grant of – Necessary in cases of agricultural and HUF properties where there is likelihood of certain changes in character of immovable property during interim period."*

4) Joginder Singh & ors Vs. Suresh Kumar AIR 2015 HP 18 *The Hon'ble Himachal Pradesh High Court held that,*

"Defendant raised construction over portion of suit land without getting same partitioned. Said act would amount to treatening to evade rights to other co-sharers. Defendant not in exclusive possession of vacant suit land over which he intended to raise construction. In violation of rights of interest of other co-sharers, defendant cannot be permitted to go ahead with construction."

5) J. Rajendran Pillai Vs. B.Bhasi Kerla HC 2022

wherein it is held that co-owner defendant attempting to construct a building in the co-ownership property during the pendancy of the final decree propceedings. Plaintiff, another co-owner not consented to such a construction. Thus such construction cannot be permited without the knowledge and consent of other co-owners and such construction may cause prejudice to the right of enjoyment of the other co-owners as they wish on seperation of shares.

३०. प्रतिवादी नं. २ ते ४ तर्फे खालील न्यायनिवाड्यांवर भिस्त ठेवण्यात आली.

1) **Prakash S. Akotkar and ors. Vs.Mansoorkha Gulabkha and ors.AIR 1996 BOMBAY 36** *Bombay High Court Nagpur held that,*

"Co-owner in possession of property for and on behalf of other co-owners cannot calim injunction against other co-owners restraining themfrom interfering with his possession and enjoyment of suit property so as to exclude them from exercising their right as co-owners. "

2) **Udayraj Babaso Patil Vs. Promod Babaso Patil AIR online 2023 BOM 65** *The Hon'ble High Court held that,*

"Plaintiff seeking to restrain defendants from carrying out any permanent construction on suit property. Suit property between three brothers were partitioned equally amongst them. Physical division of suit property

between three brother was not done. However, theree portitions of suit property which had come to entitlement of three brothers were used by three brothers to exclusion of other two brother. Plaintiff had put up a wire fencing around portion allocated to him. i.e. his share, thus himself demarcating portion of suit property unto himself for his exclusive use. It cannot be contended by plaintiff that suit property was still undivided suit property. Finding of Appellate Court that suit property was not sub-divided and partitioned between parties in partition suit. Order granting temporary injunction and restraining defendant from carrying out construction of structure/ house, in his portion of property set aside. "

3) **Bachan Singh Vs. Swran Singh AIR 2001 Punjab and Haryana 112.** The Hon'ble Punjab and Haryana High Court held that,

"*Temporary or permanent cannot be claimed by co-owner of property against other co-owner who has been in exclusive possession of entire or part of property unless any act of other co-owner amounts to ouster prejudicial or adverse to interest of co-owner out of possession.*"

4) **Capt. Harcharanjit Singh Thind Vs. Deeksha Thind & 2008 (3) AIR BOM R 560.** The Hon'ble Bombay High Court held that,

"*A relief of injunction is discretionary and equitable. It is*

well settled principle that the party who suppresses from the Court, material facts, does not deserve the grant of any discretionary relief, much less a temporary injunction. It is also well settled that a Court will not help a party who has not come with clean hands. In this view of the matter also, the application ought to have rejected. There is no merit in this appeal and, accordingly, the same is hereby dismissed."

5) **The Rajasthan State Industrial Development and Investment Corporation & ors. Vs. Diamond and Bem Development Corporation Ltd & ors. AIR 2013 SUPREME COURT 1241.** The Hon'ble Supreme Court held that,

"*A party cannot be permited to 'blow ho-blow cold', 'fast and loose' or 'approbate and reprobate'. Where one knowingly accepts the benefits of a contract, or conveyance, or of an order, he is estopped from denying the validity of, or the binding effect of such contract, or conveyance, or order upon himself. A person may be precluded, by way of his actions, or conduct, or silence when it is his duty to speak, from asserting a right which he would have otherwise had.* "

कारणमिमांसा

मुद्दा नं. १ ते ३ करीता :-

३१. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ प्रमाणे कोणत्या

परिस्थीतीत तुर्तातुर्त ताकिद देता येईल याबाबत स्पष्टीकरण दिलेले आहे. न्यायालयाच्या समोर एखाद्या दाव्यामध्ये शपथेवर एखादे कथन सिध्द करुन अथवा अन्य मार्गाने जर दावा मिळकत ही नुकसान, नाश अथवा हस्तांतरित करण्याच्या विचारात दाव्यातील संबंधित पक्षकार असतील अथवा संबंधित मिळकत ही बेकायदेशीररित्या एखाद्या दरखास्तीच्या मागणीमध्ये विक्री होत असेल, प्रतिवादी हे दावा मिळकत त्या जागेवरुन हालवायचा प्रयत्न करत असतील अथवा नाश करण्याचा प्रयत्न करत असतील, प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रयत्न करत असतील किंवा त्या अनुषंगाने वादीला नुकसान होईल असे कृत्य करत असतील तर न्यायालयाला सदरचे कृत्य थांबवण्याच्या उद्देशाने तुर्तातुर्त मनाई आदेश पारीत करण्याचे ऐच्छीक अधिकार दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये दिलेले आहेत. परंतु सदरचे अधिकार वापरताना न्यायालयाने वादी व प्रतिवादी यांची कथने व पुरावा याचा विचार करुन वस्तुस्थिती संदर्भात न्याय देण्यासाठी ऐच्छीक अधिकाराचा वापर करणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज मंजूर होण्यापुर्वी प्रथमदर्शनी केस, न्यायाचा समतोल व कधीही भरुन न येणारे नुकसान या बाबी सिध्द करणे आवश्यक आहे.

३२. वादी, प्रतिवादी यांच्या दरम्यान असलेले नातेसंबंध मान्य आहेत. दावा मिळकती वडिलोपार्जित असल्याचे तसेच त्याचे वाटप झाले नसल्याचे व त्यामध्ये सर्वजण सोयीने समाईकात वहिवाट करत असल्याचे उभय पक्षांना मान्य आहे. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादी क्र.२ यांनी भुमापन नं. ४६/२ मध्ये बांधकाम करत असल्याचे देखील मान्य केले आहे.

३३. प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांचे कथनांनुसार वादी व प्रतिवादी

क्र. २ ते ४ एकत्र राहत असून एकमेकांच्या संमत्तीने मिळकतीत नवीन बांधकाम करत आहेत. वादीने ते बांधकाम करत नाहीत असे कथन केले आहे. मात्र प्रतिवादी क्र.२ ते ४ च्या बांधकामास त्यांनी हरकत घेतली नाही. याउलट बांधकामास हरकत नाही असे म्हणणे दिले आहे. यावरुन वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ बांधकाम करण्याच्या तयारीत आहेत या प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ च्या कथनास दुजोरा मिळतो.

३४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ नुसार दावा मिळकतीस नुकसान होणारे कृत्य जर कोणी करत असेल तर प्रतिवादी देखील तुर्तातुर्त ताकीद मागू शकतात. वाटपाच्या दाव्यात प्रत्येक वादी हा प्रतिवादी व प्रत्येक प्रतिवादी हा वादी असतो. तसेच वडिलोपार्जित मिळकतीती सर्वजण सह हिस्सेदार असतात. त्यामुळे प्रतिवादीने प्रतिदावा दाखल न करता दिलेला ताकीद अर्ज चालणारा नाही. या प्रतिवादी क्र.२ ते ४ तसेच वादीच्या कथनात तथ्य नाही. प्रतिवादी क्र.२ ते ४ चे कथन आहे की, बाकी प्रतिवादी यांनी वडिलोपार्जित मिळकतीमध्ये घरे बांधली आहेत. या प्रतिवादीचे घराची अवस्था चांगली नाही. घराच्या भिंतीलगत उंबराचे झाड आहे व ते भिंतीला नुकसान करीत आहे. त्यामुळे त्यांना नवीन घर बांधणे गरजेचे आहे. अशी जर परिस्थिती असली तरी यापुर्वी कोणी, कुठे व कधी घरे बांधली हा वाद विषय नाही. मात्र सध्यस्थितीत वाटपाचा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना त्यांचे घराजवळ नवीन इमारत बांधता येईल का हे पाहणे आवश्यक आहे.

३५. प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांनी दाखल केलेल्या न्यायनिवाड्यानुसार दावा मिळकतीचे वाटप झाले नसताना तसेच इतर सह

हिस्सेदारांची परवानगी नसताना वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ सदर मिळकतीत बांधकाम करु शकत नाहीत. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी दाखल केलेले न्यायनिवाडे पाहता वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाटप झाले नसल्यामुळे व ते एकमेकांच्या सोयीने मिळकतीत वहिवाट करत असल्यामुळे सर्व मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचा हक्क आहे. अशा परिस्थिती दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी कायम स्वरुपी बांधकाम केलेस इतर सह हिस्सेदाराचे नुकसान होणार आहे. प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांनी दाखल केलेल्या फोटो वरुन प्लिंथ लेव्हलपर्यंत बांधकाम झाल्याचे दिसते. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी जुन्या घराचे फोटो दाखल केले आहेत. अशी जरी परिस्थिती असली तरी दावा मिळकतीचे वाटप झाले नसल्यामुळे सकृतदर्शनी केस व न्यायालयाचा तराजू प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांच्या बाजूने आहे.

३६. वादीने त्यांची केस शाबीत केली तर कोणाला किंती कोणत्या ठिकाणी हिस्सा मिळणार हे त्यावेळी ठरु शकते. परंतु दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी बांधकाम केले तर निश्चितच इतर प्रतिवादींचे नुकसान होणार आहे व दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊन अजून प्रकरणे वाढण्याची शक्यता आहे. तसेच सक्तीचे वाटप करावे लागू शकते. प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे बांधकाम केवळ प्लिंथ लेव्हलपर्यंत असल्यामुळे ते थांबविल्यास त्यांचे कमी नुकसान होऊ शकते. मात्र त्यांनी बांधकाम केलेस इतर प्रतिवादींचे जास्त नुकसान होणार आहे.दावा मिळकत भुमापन क्र.४६/२ चे दाव्याच्या निर्णयापर्यंत जतन करणे गरजेचे आहे आणि त्यासाठी वादी व प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना तुर्तातुर्त ताकीद देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास सदर मिळकतीत बांधकाम पूर्ण झालेस भविष्यात

गुंतागुंत निर्माण होणार आहे. सबब प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मुद्दा क्र. १ ते ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाो आदेश पारित करण्यात येतो.

आदेश

१. प्रतिवादी नं. ५, ९, ११ ते १३ यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी आणि प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी भुमापन क्र. ४६/२ या मिळकतीत स्वतः अगर इतरांमार्फत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत कोणत्याही प्रकारचे नवीन बांधकम करु नये अशी तूर्तातूर्त ताकीद देण्यात येते.

३. अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM

Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM
Date: 2025.08.18 18:01:51 +0530

शिराळा (व्ही. ए. देसाई)

दिनांक १३/०८/२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer	:	A.S.Patil
Court	:	C.J.J.D. & J.M.F.C., Shirala
Date	:	13/08/2025
Order signed by the Presiding Officer on	:	18/08/2025
Order uploaded on	:	18/08/2025